REGISTERED No. B 3434.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २२ आक्टोबर १९४७ अंक ४३


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,०८,१९५ |
| खेळतें भांडवल | रु. ६५,००,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर



वि ज य
टेक्सटाइल्स लि.
—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स.



★ बँक ऑफ पूना लि. ★
—शेड्यूल्ड बँक—
हेड ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें २

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | .. रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १५,००,००० |
| वसूल भांडवल ... | ...रु. ११,५०,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया [ चेअरमन ], २ शेठ दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी. [ व्हा. चेअरमन ], ३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर, एम. ए. पीएच. डी, ४ मि. फ्रामजी पेस्तनजी पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, सोलापूर, ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी.

सेफ डिपॉझिट लॉकरची सोय

() बँक चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारते. चालू खात्यावर ११२ टक्का व्याज. सेव्हिंग्ज खात्यावर १॥ टक्का व्याज.

मुदतीच्या ठेवींचे दर : सहा महिने १॥। टक्के. एक वर्ष २॥ टक्के. तीन वर्षे ३ टक्के.

() मुंबईवरील चेक कमिशन न घेतां स्वीकारले जातात. प्रमुख शहरांवर ड्राफ्ट्स दिले जातात. बाहेरगांवच्या खातेदारांना विशेष सोयी.

() शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक संस्थांना विशेष सवलती.

शाखा : (१) ११ भवानी पेठ, पुणें २, (२) ३६१ सदाशिव पेठ पोस्टासमोर, पुणें २, (३) टिळक चौक, सोलापूर.

जी. जी. साठे
A. B. I. ( London ) मॅनेजर.

## विविध माहिती

**कर्जाच्या विनियोगांत बदल—**एक्सपोर्ट इंपोर्ट बँकनें फ्रान्सला एका वर्षापूर्वी ६५ कोटी डॉलर्सचें कर्ज यंत्र-सामुग्रीच्या खरेदीसाठी दिलें होतें. त्यापैकीं १८½ कोटी डॉलर्सचा उपयोग अमेरिकन कोळसा व इतर आवश्यक कच्चा माल ह्यांच्या खरेदीसाठीं करण्यास बँकेनें फ्रान्सला परवानगी दिली आहे.

**कैदी घोडे परत केले—**अमेरिकन फौजांनीं युद्धामध्यें जर्मनींत कांहीं घोडे पकडले व ते अमेरिकेंत नेले. ह्या घोड्यांवर पोलंड, हंगेरी व युगोस्लाव्हिया हे मालकी सांगूं लागले. ही मालकी सिद्ध झाली कीं ते घोडे मूळ मालकांस परत दिले जातील. १ नोव्हेंबरचे सुमारास १२० कैदी घोडे अमेरिकेहून ट्रिएस्ट ह्या इटालियन बंदराकडे जाण्यास निघतील व तेथें पोचल्यावर ते हंगेरीच्या हवालीं केले जातील.

**मद्रास प्रांतांत सिमेंटचे नवे कारखाने—**मद्रास प्रांतांत आणखी चार सिमेंटचे कारखाने काढण्यास हिंदुस्थान सरकारची परवानगी मिळविण्याचा प्रयत्न मद्रास सरकार करीत आहे. आतांपर्यंत तिनेवेल्ली येथें एक व कुर्नूल जिल्ह्यांत एक अशा वार्षिक १½ लक्ष टनांच्या कारखान्यांस मंजुरी मिळाली आहे.

**दारूबंदीसाठी विक्रीकर—**मद्रास प्रांतांत संपूर्ण दारूबंदी झाली म्हणजे त्या प्रांतिक सरकारचें उत्पन्न १४ कोटी रुपयांनीं घटेल, तें भरून काढण्यासाठी केलेली विक्री कराची योजना १० ते ११ कोटी रुपये देईल.

**पाकिस्तानांत १७ नव्या गिरण्या—**पाकिस्तानांत ३,७०,८४८ चात्यांच्या १७ गिरण्या स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी सहा गिरण्या पूर्व पाकिस्तानाच्या वाटणीस येतील आणि जुनागड, भवालपूर व खैरपूर ह्या संस्थानांस प्रत्येकी एक गिरणी मिळेल. सिंधमध्यें तीन गिरण्या स्थापन होतील आणि पश्चिम पंजाबांत एक निघेल.

**डॉलर्स मिळविण्यासाठी मोटारींची निर्गत—**"डॉलर्सच्या शोधा"साठी सात रोल्स रॉइस व बेन्टले ह्या महागड्या मोटार गाड्यांचा एक ताफा ग्रेट ब्रिटनहून अमेरिकेस ता. ९ रोजीं निघाला, त्यास सर स्ट्रफर्ड क्रिप्स ह्यांनीं निरोप दिला.

**ब्रिटिश मंत्रिमंडळांतील तरूण मंत्री—**ग्रेट ब्रिटनचे नवे प्रेसिडेंट ऑफ दि बोर्ड ऑफ ट्रेड, मि. हॅरोल्ड विल्सन, ह्यांचें वय अवघें ३१ वर्षांचें आहे. विल्यम पिट २४ व्या वर्षी मुख्य प्रधान झाला होता. चर्चिल व ग्लॅडस्टन ह्यांनाहि अनुक्रमें ३४ व्या व ३३ व्या वर्षी बोर्ड ऑफ ट्रेडच्या प्रेसिडेंटची जागा मिळाली होती.

**रेडिओचा जनक कोण?—**"मार्कोनीच्या सन्मानार्थ भरविलेल्या परिषदेंत मार्कोनी हाच वायरलेस टेलिग्राफीचा संशोधक म्हणून मानला गेला. अलेक्झांडर पोपॉव्ह ह्या रशियन शास्त्रज्ञानें १९०५ सालीं आपला रेडिओ जाहीरपणें दाखविला आणि जानेवारी १९०६ मध्यें त्यास शास्त्रीय वाङ्मयांत प्रसिद्धि दिली. मार्कोनीनें जुलै १९०६ मध्यें आपल्या पेटंटसाठी अर्ज केला, त्यांतील सार्कीट पॉपॉव्हच्या सर्किटप्रमाणेंच मुख्यतः होतें. तेव्हां पॉपॉव्ह हाच रेडिओचा जनक आहे." इझवेस्तिया ह्या रशियन सरकारी वृत्तपत्रांत प्रमुख रशियन शास्त्रज्ञांनीं वरीलप्रमाणें माहिती दिली आहे.

**कलकत्ता वीज कंपनी सरकारी मालकीची होणार—**कलकत्त्यामधील वीज कंपनी विकत घेण्याचें पूर्व बंगाल सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी त्यानें हिंदुस्थान सरकारकडे ३० कोटी रुपये कर्जाची मागणी केली आहे.

**क्लिअरिंग हाउसमधील चेक्सची देवघेव**

कलकत्ता, मुंबई, मद्रास, कराची, रंगून, कानपूर, लाहोर व दिल्ली येथील क्लिअरिंग हाउसेस मोठीं असून अहमदाबाद, अमृतसर, कालिकत, कोइमतूर, लखनौ, मदुरा, मंगलोर, सिमला, नागपूर, रावळपिंडी, पाटणा, अलाहाबाद, लायलपूर, जालंदर, आग्रा, डेहराडून, अलेप्पी, राजकोट, गया व पुणें येथेंहि क्लिअरिंग हाउसेस आहेत. त्या सर्वांत मिळून १९४६–४७ मध्यें ७१६८ कोटी रुपयांच्या चेक्सची उलाढाल झाली. १९४५–४६ मध्यें ६५४३ कोटी रुपयांच्या चेक्सची उलाढाल झाली होती. म्हणजे, ६२५ कोटी रुपयांनीं उलाढाल वाढली, त्यांत मुंबई क्लिअरिंग हाउसचा वाढावा ३७१ कोटी रुपयांचा आहे. मद्रास आणि कराची येथील उलाढालहि अनुक्रमें ८० व ५६ कोटी रुपयांनीं वाढली. बंगालमध्यें, विशेषतः कलकत्ता शहरांत, जातीय परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळें कलकत्ता केंद्रानें विशेष वाढ दाखविली नाहीं. १९३८–३९ मध्यें क्लिअरिंग हाउसेसनीं एकूण "१००" इतक्या रकमेच्या चेक्सची उलाढाल केली असें मानलें तर ही उलाढाल वाढत वाढत जाऊन १९४६-४७ मध्यें "३५५" वर गेली. बँकांतील ठेवींमधील रकमा कितपत फिरत्या रहातात हें पहाण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे क्लिअरिंग हाउसेसमधील चेक्सच्या उलाढालीचें शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींशी प्रमाण काय पडतें, तें पहाणें हें होय. ठेवींचा फिरतेपणा १९४२–४३ पर्यंत उतरत जाऊन पुढें तो खालच्या पातळीवर स्थिर राहिला, हें खालील आकडे दर्शवितात.

| वर्ष | शेड्यूल्ड बँकांचीं डिमांड देणीं (कोटी रु.) (अ) | क्लिअरिंग हाउसेस मधील उलाढाल (कोटी रु.) (ब) | 'ब', 'अ' च्या किती पट |
|---|---|---|---|
| १९३८–३९ | १२३·८ | १८९३ | १५·२ |
| १९३९–४७ | १३२·६ | २२२१ | १६·७ |
| १९४०–४१ | १५५·८ | २०३० | १३·० |
| १९४१–४२ | २००·१ | २५७५ | १२·९ |
| १९४२–४३ | ३०६·३ | २८१६ | ९·२ |
| १९४३–४४ | ४५६·६ | ४२८१ | ९·४ |
| १९४४–४५ | ५८४·८ | ५२७९ | ९·० |
| १९४५–४६ | ६५४·५ | ६१२० | ९·३ |
| १९४६–४७ | ७२५·५ | ६७१७ | ९·३ |

**महाराष्ट्र बँकेची दादर येथील शाखा—**महाराष्ट्र बँकेच्या दादर येथील शाखेनें बुधवार, ता. १५ रोजीं कामास प्रारंभ केला. कचेरीचा पत्ता जिवा देवसी निवास, रानडे रोड, असा आहे.

**डॉलर्स मिळविण्यासाठी व्हिस्कीची निर्गत—**ग्रेट ब्रिटनमध्यें १९३९ सालीं जेवढी व्हिस्की तयार झाली, त्याच्याहि पेक्षा ज्यास्त व्हिस्की त्या देशांत आतां तयार होते. परंतु त्यापैकीं तीन चतुर्थांश व्हिस्कीची अमेरिकेकडे निर्गत होते, आणि प्रत्यक्ष ग्रेट ब्रिटनमध्यें त्यामुळें लोकांची गैरसोय होते.

**लॉर्ड पॅसफील्ड (मि. सिडने वेब) ह्यांचें निधन—**फेबिअन सोसायटीचे संस्थापक, लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्सचे एक प्रमुख संस्थापक, प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व समाजसत्तावादावरील अनेक ग्रंथांचे लेखक लॉर्ड पॅसफील्ड (मि. सिडने वेब) हे आपल्या वयाच्या ८८ व्या वर्षी, ता. १३ रोजीं मृत्यु पावले. त्यांच्या पत्नी, मिसेस बिएट्रिस वेब, ह्यांची विद्वत्ताहि त्यांच्या तोडीची होती आणि ग्रंथलेखन त्या दोघांनीं जोडीनें केलें. मिसेस वेब १९४३ सालीं निवर्तल्या.

# अर्थ

बुधवार, ता. २२ आक्टोबर, १९४७



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## इंग्लंडची " बिकट " आर्थिक परिस्थिति

### अन्नपुरवठ्याची युद्धपूर्व पातळी अद्याप कायम आहे !

ग्रेट ब्रिटननें अमेरिकेचें कर्ज मुदतीपूर्वींच खर्चून टाकल्या-कारणानें, परदेशांतून अन्न व कच्चा माल ह्यांची आयात करण्या-साठीं त्या देशाजवळ विनिमय साधन आतां उरलेलें नाहीं. त्या कारणानें, ग्रेट ब्रिटनला आपली आयात कमी करणें आवश्यक झालें आहे. ब्रिटननें अमेरिकेकडून अन्न खरेदी तूर्त बंद ठेवली आहे, अमेरिकन चित्रपटांवर बंदी घातली आहे आणि पेट्रोलचा वापर शक्य तेवढा कमी केला आहे. ह्या जिनसांच्या खरेदीसाठीं यावे लागणारे डॉलर ग्रेट ब्रिटनजवळ नाहींत. ब्रिटिश शेतीचें उत्पादन कितीहि वाढलें, तरी त्या देशाचें अन्नासाठीं परावलंबन दूर होण्याजोगी परिस्थिति नाहीं आणि हें अन्न मिळविण्यासाठीं ब्रिटिश निर्गत व्यापार वाढविणें हा एकच उपाय शिल्लक आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें मोठ्या प्रमाणावर माल तयार झाला, तरी तो ब्रिटिश जनतेस उपलब्ध करून न देतां त्याची निर्गत करावयाची व त्याच्या मोबदल्यांत अधिक जरूरीच्या जिनसा मिळवावयाच्या, असें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे.

डॉलर्स मिळविण्यासाठीं ब्रिटिश मोटारगाड्या अमेरिकेकडे जाऊं लागल्या आहेत आणि व्हिस्कीचें उत्पादन ग्रेट ब्रिटनमध्यें पुष्कळच वाढलें असलें तरी त्या उत्पादनाच्या तीन चतुर्थांशाइतकी व्हिस्की घरच्या लोकांची गैरसोय करूनहि अमेरिकेकडे धाडण्यांत येत आहे. अर्जेंटिनास ग्रेट ब्रिटनकडून कित्येक जिनसा हव्या आहेत, त्या पुरवल्या तरच तो देश ग्रेट ब्रिटनला अन्नपुरवठा करीत राहील. ह्यासाठीं, घरें बांधण्याच्या, रेल्वे सुधाराईच्या व कारखाने उभारण्याच्या योजना ग्रेट ब्रिटनला स्थगित कराव्या लागत आहेत. एवढ्यानें भागेलच असें नाहीं आणि ग्रेट ब्रिटनला आणखीहि त्याग करावा लागेल असें दिसतें. ब्रिटिश सरकार आणि जनता ह्यांचा अंतिम यशावर विश्वास असल्या कारणानें, ब्रिटिश सरकारच्या योजनांची अंमलबजावणी मनापासून व कार्यक्षमतेनें होत आहे.

ब्रिटिश प्रयत्नांचें हें चित्र पाहिलें, म्हणजे तेथील लोकांच्या हालअपेष्टांबद्दल आपली कांहीं विशिष्ट समजूत होईल ती मात्र वस्तुस्थितीस धरून नाहीं, हें येथें स्पष्ट केलें पाहिजे. अर्थात्, ब्रिटिश एकजुटीचें व सतत प्रयत्नांचें तें फळ असून, आपल्या रहाणीचा दर्जा कायम राखण्यासाठीं इंग्रजांची किती कोशीस चालू असते हें त्यावरून दिसून येतें. हिंदुस्थानांत आपण अन्न परिस्थितीचा विचार करतो, तेव्हां उपासमार व रोगराई ह्यांचा आढावा घ्यावा लागतो आणि भूकबळींच्या संख्येवरून आपण आणीबाणीच्या परिस्थितीचें गांभीर्य ठरवितो. ही परिस्थिति कोणीकडे आणि ग्रेटब्रिटनमधील अन्न परिस्थिति कोणीकडे ? ह्या संबंधांतील आकडे फारच उद्बोधक आहेत आणि त्यांवरून ग्रेट ब्रिटनवरील आपत्तीचें स्वरूप नीट लक्षांत येईल. तेथील लोकांपुढील प्रश्न तात्कालिक जगण्या-मरण्याचा नसून, पोटभर सकस अन्न पुढेंहि कायम मिळत रहाण्याबाबत आहे. १९४६-४७ ( जुलै ते जून ) ह्या वर्षी तेथील प्रत्येक नागरिकास सरासरीनें २,८८० कॅलरीचें अन्न दररोज मिळालें; म्हणजे युद्धापूर्वीच्या आकड्यापेक्षा हा आंकडा फक्त ४% कमी आहे. १९४२ सालीं तेथील जनतेस २,८८० कॅलरीचें अन्नच मिळत असे. म्हणजे, युद्धापूर्वीच्या मानानें आतांहि तेथील जनतेस सुमारें तितक्याच कॅलरी मिळत आहेत, आणि ४% घट ही विचारांत घेण्याचें कारण नाहीं इतकी अत्यल्प आहे. स्निग्ध पदार्थांचा उठाव १९४६-४७ सालीं युद्धापूर्वीच्या मानानें ८५% झाला, मांसल द्रव्यांचा उठाव वाढला आणि पिष्टमय द्रव्यांचा उठाव युद्धापूर्वीइतकाच कायम राहिला. युद्धापूर्वीच्या मानानें बटाटे मात्र लोकांच्या खाण्यांत ज्यास्त म्हणजे १६७% इतके आले. गव्हाचे पदार्थ लोकांच्या पोटांत १२% अधिक गेले आणि भाजीपालाहि जास्त प्रमाणांत लोकांना मिळाला. डेअरीचे पदार्थहि अधिक प्रमाणांत उपलब्ध झाले आणि मासेहि २८% ज्यास्त खाल्ले गेले. अंडीं १४% आणि फळें वगैरे १८% कमी मिळालीं. ही माहिती ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केलेल्या पत्रकांतच दिलेली आहे आणि तीवरून जून, १९४७ अखेरच्या बारमाहींतील अन्नपरिस्थितीवर स्पष्ट प्रकाश पडतो.

अन्नाचा सकसपणा किंवा पुरेपणा ह्याबद्दल तेथील लोकांची तक्रार नाहीं; पूर्वीप्रमाणें विविधता मिळूं शकत नाहीं एवढेंच काय तें. ब्रिटिश प्रचार मात्र चांगला असल्याकारणानें, कित्येक जबाबदार हिंदी लोकही येथील अन्न तुटवड्याकडे दुर्लक्ष करून ब्रिटिश जनतेशीं सहानुभूति व्यक्त करण्याचा वेडेपणा करीत असल्याचें दिसून येतें. ब्रिटिश परिस्थिति बिकट खरी, परंतु तिची पातळी वेगळी व हिंदी बिकट परिस्थितीची पातळी वेगळी, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. आपण अद्याप किती कसून प्रयत्न केले पाहिजेत व अजून केवढा मोठा पल्ला आपणांस गांठावयाचा आहे, हें वरील वृत्तांतावरून स्पष्ट होईल.

---

### गव्हाची बचत

युरोपकडे गहूं पाठविण्यासाठीं त्याची बचत करण्याच्या दृष्टीनें अमेरिकेंतील दारू गाळणाऱ्या कित्येक कंपन्यांनीं दोन महिनेपर्यंत गव्हाचा दारूकडे उपयोग न करण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें सुमारें १० ते २० लक्ष बुशेल धान्याची बचत होईल.

### कपाशीच्या साठ्यांची सिंध सरकारला काळजी

सिंधमधील पिकांत कपाशीचें पीक अत्यंत महत्त्वाचें आहे. त्याची वार्षिक किंमत १५ कोटी रुपयांचेवर भरते. दंग्याधोप्यामुळें कपाशीच्या साठ्यांचें नुकसान होऊं नये, ह्यासाठीं सिंध सरकारनें जिनिंग फॅक्टऱ्यांच्या ताब्यांतील कपाशीच्या साठ्यांची, दंग्याधोप्याच्या नुकसान भरपाईची योजना तयार केली आहे. कपाशीच्या वहातुकीवर व साठ्यावर पहारा करण्यासाठीं सिंध सरकारनें खास पोलिसांची व्यवस्था केली आहे. कपाशीचें मोठ्या प्रमाणावर नुकसान झालें तर त्यामुळें सिंध सरकारच्या आर्थिक संसारावर मोठाच परिणाम होईल.

## स्फुट विचार

### श्री. नंदा ह्यांच्या सडेतोड भाषणाचा अर्थ ?

प्रांतिक लेबर ॲडव्हायसरी बोर्डाची सभा पुणें येथें नुकतीच भरली होती. ह्या बोर्डावर कारखानदार, कामगार, उपभोक्ते नागरीक व सरकार ह्यांचे प्रतिनिधी असतात. बोर्डाच्या सभेंत प्रास्तविक भाषण करतांना, मुंबई सरकारचे मजूर खात्याचे मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा, ह्यांनीं उत्पादन वाढीच्या आवश्यकतेवर भर दिला, हें योग्यच झालें. उत्पादनाच्या प्रश्नाची तातडी किती आहे, ह्याविषयीं कोणाचेच मनांत आतां शंका उरलेली नाहीं. परंतु, उत्पादन वाढीचे मार्गांतील अडचणींचा विचार करतांना कामगारांची सध्याची वृत्ती उत्पादन वाढीस पोषक नाहीं, अशी तक्रार बहुतेक प्रमुख कारखानदारांनीं केलेली आहे. त्याचप्रमाणें, कारखानदार आणि गिरणीमालक ह्यांचेकडेहि दोष नाहीं, असेंहि कोणी म्हणत नाहीं. परंतु, श्री. नंदा ह्यांनीं गिरणीमालक व कारखानदार ह्यांचेविषयीं काढलेल्या उद्गारांबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यांत येत आहे. ते म्हणाले, " आजच्या गंभीर परिस्थितींत, ज्यांना ह्या देशाच्या स्वातंत्र्याबद्दल व सुरक्षिततेबद्दल कांहींहि आस्था वाटत नाहीं व ज्यांना कामगारवर्गाच्या हिताविषयींहि कळवळा येत नाहीं, अशांनीं मडाणी कामगारांच्या असहायतेचा फायदा घेत रहाणें व परिस्थिति आटोक्यांत आणण्याऐवजी तिचेकडे केवळ त्रयस्थाप्रमाणें पहात बसणें म्हणजे विस्तवाशीं खेळ करण्याप्रमाणें आहे. कामगारांच्या हट्टीपणास व त्यांच्या पुढाऱ्यांच्या विनाशक चळवळीसच हल्लींच्या परिस्थितीस जबाबदार धरणें युक्त होणार नाहीं. मालकवर्गाचा लोभ, आधाशीपणा, तात्कालिक फायद्याकडे लक्ष, इत्यादींमुळें समाजाचें नुकसान झालें आहे व होत आहे. कामगार व मालक ह्यांचे संबंध सुधारण्यासाठीं व कार्यक्षमता आणि उत्पादन वाढविण्यासाठीं केलेल्या योग्य सूचना कित्येक प्रसंगी मालकवर्गानें बाजूस सारल्या आहेत. " श्री. नंदा ह्यांनीं मालकवर्गावर केलेल्या ह्या कडक टीकेचा अर्थ काय समजावयाचा ? मालकवर्गावर नवीन बंधनें बसविण्याचा सरकारचा उद्देश असेल व हीं नियंत्रणें तात्काळ येणार असतील तर त्यांनीं केलेलें भाषण नव्या कार्यक्रमाची सूचना देणारें झालें असें म्हणतां येईल. नाहीं तर, कामगार वर्गास आणखी चिथावणी मिळण्यापलिकडे त्याचा कांहींहि परिणाम होणार नाहीं आणि उत्पादन वाढीच्या सरकारी धोरणास त्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. तूर्त तरी श्री. नंदा ह्यांच्या भाषणांतील सुराबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यांत येत आहे.

---

### गळिताचीं धान्यें निर्गत करणार, का त्यांचा औद्योगिक उपयोग करणार ?

गळिताच्या धान्यांचे उत्पादकांत हिंदुस्थानचा अनुक्रम अतिशय वर लागतो. भुइमुगाच्या उत्पादनाचे बाबतींत तर हिंदुस्थान अग्रेसर आहे. अळशीच्या उत्पादनाचे बाबतींत हिंदुस्थान अर्जेंटिनाच्या खालोखाल येतो. एरंडी, सरसू, मोहरी, इत्यादींचें उत्पादनहि हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर होतें. गळिताच्या धान्यांस आज जगभर एवढी प्रचंड मागणी आहे, कीं हिंदी उत्पादन वाढलें तरी ती मागणी पुरी पडूं शकणार नाहीं; परंतु गळिताच्या धान्यांचें उत्पादन वाढवितांना अन्नधान्याखालील क्षेत्र कमी होऊं देतां कामा नये, हें उघड आहे. गळिताच्या धान्यांचें दर एकरीं उत्पादन कसें वाढेल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पूर्व आफ्रिकेंतील एका निम-सरकारी संस्थेनें भुइमूग व गळिताचीं धान्यें ह्यांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर सुरू केलें आहे. इंडियन ऑईल सीडस कमिटीच्या सभेंत वरील महत्त्वाच्या घडामोडींकडे व्यापारमंत्रि श्री. भाभा ह्यांनीं लक्ष वेधलें आणि हिंदुस्थानानें ह्या संबंधांतील नेतृत्वाची जागा न सोडण्याचें महत्त्व प्रतिपादन केलें. गळिताच्या तेलांचें औद्योगिक महत्त्वहि वाढत चाललें आहे, ही गोष्ट वनस्पति तुपाच्या लोकप्रियतेवरून सहज लक्षांत येण्याजोगी आहे. गळिताचीं धान्यें निर्गत करून पूर्वीप्रमाणें पैसे मिळवावयाचे, का त्यांचा औद्योगिक उपयोग वाढवावयाचा, ह्याचा नीट विचार होण्याची वेळ आतां आली आहे.

---

### कोळशाचें उत्पादन कमी होणार काय ?

बंगाल व बिहार ह्यांमधील कोळशाच्या खाणींचें उत्पादन २५% कमी करण्यांत यावें, अशी खाणीवाल्यांच्या संघानें मागणी केली आहे. वहातुकीच्या अडचणीमुळें काढलेला कोळसा पडून रहात आहे. पूर्वीं सुमारें १० लक्ष टन कोळसा शिल्लक राही; आतां २५ लक्ष टनांवर कोळसा शिल्लक असून रेल्वे वॅगन्सची वाट पहात आहे. युद्धापूर्वीच्या मानानें आतां कोळशाच्या उत्खननाचा खर्च ४०० % झाला आहे; तेव्हां शिलकी कोळसा साठवून ठेवण्यांत फार पैसा गुंतून रहाणें खाणीवाल्यांना परवडत नाहीं. युद्धकालांत अशा कोळशाची किंमत सरकार अगाऊच देऊन टाकीत असें; तसें त्यानें पुनः सुरू करावें असें सुचविण्यांत येत आहे. खाणीवाल्यांच्या मतें, वॅगन्सचा पुरवठा पुरेसा होण्याची आणखी सहा महिने तरी शक्यता दिसत नाहीं. तेव्हां, परिस्थितींतून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे उत्पादन नियंत्रित करणें हाच होय, असें खाणीवाल्यांचें म्हणणें आहे. बंगाल आणि बिहार येथील खाणींचें उत्पादन २५% कमी झालें तर परिस्थिति आटोक्यांत येईल; वॅगन्सचा पुरवठा मात्र कमी पडतां कामा नये, असें खाणवाल्यांनीं म्हटलें आहे. उत्पादन कमी करावयाचें म्हणजे खाणीकामगारांची संख्या कमी करावयाची हें ओघानें आलेंच; हा पेंचप्रसंग कसा सोडवावयाचा, हा अवघड प्रश्न आतां उपस्थित झाला आहे.

---

### पोलादाची वांटणी

हिंदुस्थान, पाकिस्तान व संस्थानें ह्यांचेमध्यें १९४८ च्या पहिल्या तिमाहींत हिंदुस्थान सरकार १,५०,००० टन पोलादाची वाटणी करणार आहे. अपेक्षेप्रमाणें पुरवठा होत नसल्याकारणानें पोलादावरील नियंत्रण कायम ठेवणें सरकारास भाग पडलें आहे. उद्योगधंद्यांच्या वाटणीस ५०,००० टन पोलाद येणार असून सुधारणांच्या योजनांस १५,००० टन पोलाद मिळेल. खासगी औद्योगिक योजनांच्या वाटणीस ११,००० टन पोलाद येईल व १,५०० टनांची निर्गत होईल. सरकार-पुरस्कृत घरांच्या योजनांसाठीं ४,००० टन पोलाद राखून ठेवण्यांत आलें आहे. इतकें करून उरलेले ३२,००० टन पोलाद प्रांत व संस्थानें ह्यांच्या वाट्यास येईल.

---

**कंपनीच्या वार्षिक सभेच्या मुदतवाढीस मान्यता नाहीं**— आपली वार्षिक सभा भरविण्यासाठी मुदत वाढवून मिळावी, असा मुंबई हायकोर्टाकडे सनराइज इनव्हेस्टर्स लि. नें अर्ज केला, त्यास रजिस्ट्रार ऑफ कंपनीजनें विरोध केला. कंपनी कायद्याच्या ७६ व्या कलमांतील अटी बंधनकारक असून त्याबाबत सवलती देण्याचा कोर्टास अधिकार नाहीं, असा न्यायमूर्ति कोयाजी ह्यांनीं नुकताच त्याबाबत निवाडा दिला.

## सहकारी संस्थांचे अहवाल

### दि सोलापूर डि. सें. को. बँक लि.


वरील बँक गेली कांहीं वर्षे 'ब' वर्गांत होती ती अहवालाचे वर्षी 'अ' वर्गांत आली ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. बँकेचें शेअर भांडवल १,४९,९०० रु. असून ठेवीची रक्कम वाढून ती ३५ लाखांचेवर गेली आहे. सोसायट्यांकडील व्यवहारांत समाधानकारक वाढ झाली आहे. त्याचप्रमाणें गोडाऊनवरील कर्जें, सोन्याचे तारणावरील कर्जें आणि घर तारणावरील कर्जें ह्यांतहि वाढ आहे. सांगोला येथें एक पे ऑफिस नव्यानें उघडण्यांत आलें, तें सोडून सर्व शाखा फायद्यांत चालू आहेत. अहवालाचे वर्षी ७½ लक्ष रुपयांची नियंत्रित मालाची विक्री बँकेनें केली. सेफ डिपॉझिट लॉकर कॅबिनेटमधील कप्पेवजा तिजोऱ्या भाड्यानें देण्याचें काम सुरू झालें आहे. व्यवस्थेचा व इतर वाढता खर्च व बँकेचे कर्जदारांशीं उदार धोरण लक्षांत घेतां, ११,७३८ रुपयांचा नफा समाधानकारक वाटेल. ह्याखेरीज, नियंत्रित वस्तूंचे वाटपाचे कामीं बँकेस १३,१९३ रु. निव्वळ नफा उरला. सरकारी रोख्यांचे विक्रींत ८,१२५ रु. स्वतंत्रपणें मिळाले. त्यांचा विनियोग मजबुती वाढीकडे स्वतंत्रपणें करण्यांत आला. ५% डिव्हिडंडला ७,१९३ रु. लागले. श्री. एच. व्ही. केळकर, बी. ए., एलएल. बी., वकील, हे बँकेचे चेअरमन असून श्री. सी. एस. परांजपे, बी. कॉम., हे मॅनेजर आहेत.

### दि मोमीन वीव्हर्स को. सोसायटी लि., भिवंडी

वरील सोसायटीस २१ वें वर्ष चालू आहे. १९३४–३५ ते १९४२ ह्या मुदतींत संस्थेची परिस्थिति खालावली. तिचें पुनरुज्जीवन करण्याचें श्रेय सोसायटीचे प्रेसिडेंट मे. अब्दुल समद हाजी लाल महंमद ह्यांस प्रामुख्यानें आहे. सभासदांची संख्या आतां १,०४० झाली असून वसूल भांडवल १७,६६० रु. आहे. रिझर्व्ह व इतर फंड ४७,३९९ रुपयांचे आहेत. ह्या वर्षी ४४,००० रु. नें सुताचा कोटा कमी मिळाला तरी सोसायटीनें आपलें कार्यक्षेत्र वाढवून प्रगति केली आहे. ६२५ सभासदांचे २,२७५ हातमागांस सूत वाटपाचें काम सोसायटीनें केलें. सोसायटीनें १० लक्ष, १९ हजारांची सूत खरेदी केली. सभासदांचा तयार होणारा माल विकून देण्याचें मुख्य कार्य उद्देशानुसार सुरू झालें आहे. सूत पुरवठ्याबरोबरच सभासदांस लागणारा मिल स्टोअर्सचा माल, फण्या, वय, धोटे, पिकर्स, सिल्क, वगैरे सोसायटीनें खरेदी करून पुरवला व मिल स्टोअर्सचा व्यवहार सुरू केला. इलाख्यांतील इतर विणकर संस्थांनीं स्वतःची रंगणी व इतर सोयी करून घेतल्या आहेत; हें कार्यही सोसायटी हातीं घेण्याचा विचार करीत आहे. २१–९–४६ पासून मॅनेजरचे जागीं मि. एस. एन. कोठारे ( पूर्वीचे सहकारी खात्यांतील सुपरवायझर ) ह्यांची नेमणूक झाली, त्यामुळें संस्थेची कार्यक्षमता वाढत आहे. मे. एम. ए. पंजाबी हे सोसायटीचे चेअरमन आहेत. अहवालाचे वर्षी सोसायटीस १८,३१२ रु. निवळ नफा झाला.


### कोल्हापूर स्टेट को. बँक लि.

३०–६–४५ अखेर ६ लक्ष रुपयांचें खेळतें भांडवल होतें, तें ३०–६–४६ अखेर ११¾ लक्ष रु. झालें व आतां त्याचा आंकडा १७ लाखांवर गेला आहे. केवळ बँकिंगच्या व्यवहारांत १९४५-४६ मध्यें जेवढा नफा झाला, त्याच्या दुप्पट नफा ( १३,१८६ रु. ) अहवालाचे वर्षी झाला. वसूल भांडवलाचा आकडा एका वर्षांत ७१,००९ रु. चा १,०४,४२४ रु. झाला. एकूण कर्ज येणें ५ लक्ष रुपयांचें ९½ लक्ष रु. झालें. अशा रीतीनें सर्व दृष्टीनें प्रगति होत आहे. नफ्यांतून ५%+१% बोनस =६% प्रमाणें नफावांटणीस ४,७२९ रु. लागतील. राव. एस. जी. दाभोळकर हे बँकेचे चेअरमन असून श्री. एन. टी. सरनाईक हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.







अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

### कोल्हापूर स्टेट को. बँकेच्या वार्षिक सभेंतील चर्चा

कोल्हापूर स्टेट को. बँकेची नववी वार्षिक साधारण सभा ता. ५ रोजीं बँकेचे अध्यक्ष श्री. एस. जी. दाभोळकर यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस निरनिराळया गांवांच्या सोसायटयांचे प्रतिनिधी व व्यक्ति सभासद मिळून १५० वर लोक उपस्थित होते. सभेंत शेतकऱ्यांचे हिताचे दृष्टीनें अनेक प्रश्नांवर खुल्या दिलानें चर्चा झाली. बोर्डानें सोसायट्यांच्या हिताचे दृष्टीनें ज्या कांहीं गोष्टी केल्या व धोरण ठेवले आहे, त्याबाबत श्री. एस. जी. दाभोळकर व मॅ. डायरेक्टर श्री. नारायणराव सरनाईक यांनीं खुलासा केला तो सभेकडून मानला जाऊन, त्याबाबत एक ठरावही केला गेला.

दरबारनें कर्ज तडजोडीच्या कायद्यासारखे कायदे केल्यानें सावकारांकडून शेतकऱ्यांना कर्जे मिळणें दुरापास्त झालें. अशा प्रसंगी कोल्हापूर स्टेट को. बँकेसारख्या बँकेंकडून शेतकऱ्यांना कर्जे देणेची व्यवस्था भरपूर प्रमाणांत जर झाली नाहीं, तर वरील सारखे कायदे उपकारक होणे ऐवजी शेतकऱ्यांना अपकारक मात्र झाल्याशिवाय राहणार नाहींत. तरी दरबारनें आपल्या ठेवी या बँकेंत ठेवल्यानेंच शेतकऱ्यांना कर्जे मिळूं शकतील, इतकेंच नव्हें तर अशी कर्जे त्यांना अल्प व्याजाचे दरानें, सोईचे परत फेडीचे हप्त्यानें, तूटमितीनें व त्यांचा माल व्यापाऱ्यांना अडतीकरितां बांधला न जातां, अशा अनेक सोई एकदम होऊन मिळूं शकतील, अशी चर्चा सभेंत झाली.

### दि कोल्हापूर मराठा को. बँक लि.

वरील बँकेचें शेअरभांडवल आतां ६१,२३७ रु. झालें असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत २८,४७९ रु. आहेत. ठेवींची रकम ३ लक्ष, २ हजारांवर आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १२,९३५ रु. निवळ नफा झाला. भागीदारांस ७% डिव्हिडंड मिळालें. ह्यावरून, बँकेनें ४½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलावर चांगलें उत्पन्न मिळविलें असल्याचें दिसून येईल. मे. कर्नल के. एस. खानविलकर हे बँकेचे चेअरमन असून श्री. व्ही. एन. यादव हे ॲ. मॅनेजर आहेत.

### सांगली स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेस ३०–६–४७ अखेर संपलेल्या वर्षी १२,४८९ रु. नफा झाला. भागीदारांस द. सा. द. शें. ५ रु. १० आ. डिव्हिडंड देण्यास ४,००० रु. चा विनियोग करण्यांत आला. नफ्याच्या व डिव्हिडंडच्या आकड्यांत वरील दुरुस्ती करून ता. १५ ऑक्टोबरचे आमचे अंकांतील पृ. ३८५ वरील मजकूर वाचावा. ही चूक नजरेस आणल्याबद्दल आम्ही बँकेचे मॅनेजर श्री. ना. पां ठाणेदार ह्यांचे आभारी आहों.

### बँक ऑफ सिटिझन्सचे नवे मॅनेजर

बेळगांव येथील बँक ऑफ सिटिझन्स लि. च्या मॅनेजरचे जागीं श्री. प्रभाकरपंत कामत, बी. कॉम, ह्यांची नेमणूक झाली असून पूर्वीचे मॅ. डायरेक्टर, श्री. जी. डी. सराफ ह्यांनीं राजीनामा दिला आहे. श्री. कामत हे ह्यापूर्वी बँक ऑफ बरोडा लि. च्या नवसरी शाखेचे एजंट होते. त्यांचे हातून बँकेची सुव्यवस्थित भरभराट होईल असा संचालक मंडळास विश्वास वाटत आहे.

### सांगली स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेनें स्वतःचे इमारतीसाठी जागा खरेदी केली असून तिच्या बांधकामास लवकरच प्रारंभ होईल, असें कळतें.

पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
स्थापना-१९१७
फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११
मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.
—: शाखा :—
जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर
—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.
द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—
दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.
रुपये
आलेलें काम : : २७,२९,२५०
स्वीकृत काम : : २५,४४,७५०
पूर्ण काम : : २२,६३,०००
अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.
—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—
व. न. म्हैसूर,
मॅनेजर

**ढाका शहराची सुधारणा**—पूर्व पाकिस्तानची राजधानी, ढाका, सुधारण्यासाठीं दोघा ब्रिटिश वास्तुशास्त्रज्ञांचा सल्ला घेण्यांत येत आहे.

**१९४८ अखेर पर्यंत तरी नियंत्रणें रहाणार**—अन्नधान्याच्या बाबत तात्कालिक व दूरगामी योजना सुचविण्यासाठीं सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक कमिटी हिंदुस्थान सरकारनें कांहीं महिन्यांपूर्वी नेमली. तिनें अन्नाच्या पुरवठ्यावरील नियंत्रणें व रेशनिंग १९४८ अखेर पर्यंत चालू राहील, असें सुचविलें आहे. असें समजतें.

**अमेरिकन निग्रो शास्त्रज्ञाचा सन्मान**—सुप्रसिद्ध अमेरिकन निग्रो शिक्षणतज्ज्ञ व शास्त्रज्ञ, डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर, ह्यांच्या सन्मानार्थ अमेरिकन सरकार पोस्टाची ३ सेंटची खास तिकिटे काढणार आहे. ता. ५ जानेवारी रोजीं टस्केजी इन्स्टिट्यूटमध्यें तीं प्रथम प्रसिद्ध होतील.

**मध्यवर्ती मंत्र्यांच्या पगारांत कपात**—हिंदी मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांना हल्लीं दरमहा ५,५०० रु. पगार मिळतो. त्यांतून इनकम टॅक्स, घर भाडे, वगैरेसाठीं रकम वजा होते. आतां मंत्र्यांनीं आपण होऊन आपला पगार कमी केला आहे. ते करमाफ व घरभाडेमाफ २,५०० रु. कमी घेतील; म्हणजे दरमहा त्यांना सुमारें ७०० रु. कमी मिळतील.

**दि आयुर्वेद रसशाळा पुणें लि.**—वरील कंपनीनें गेल्या वर्षी ४ लक्ष, ११ हजार रुपयांची विक्री करून २३,४४० रु. निव्वळ नफा मिळविला. प्रेफरन्स भागीदारांना ५% व साधारण भागीदारांना ४% ( कर वजा करण्याचा ) डिव्हिडंड देण्यास १३,२५० रु. लागतील. १०,६५० रु. इनकम टॅक्स रिझर्व्हसाठीं काढण्यांत येतील. वार्षिक सभा ५-११-४७ रोजीं होईल.


# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस :**
**१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : ३,३७,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,००,००० रु. वर

~~ बँक स्ट्रीटवर ~~

३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ भेंडीबाजार (?) ३ भैंटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कँडॉक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव), ४७ नामपूर ( नाशिक ).

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर


डी. एन. गांडेकर, मॅनेजर, पुणें शाखा.
डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, हमडेरे बोळाजवळ, पुणें २

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




# साठे बिस्किटें

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल गिऱ्हाइकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

**साठे बिस्किट कंपनी, पुणें २.**

## भाडें नियंत्रण कायद्याला वळसा

### मुभादार भाडेकरी

( लेखकः— श्री. स. वा. वातार, बी. एस्सी., एलूएल्. बी. )

भाडें नियंत्रण कायदा घरमालकांना कांहीं विशिष्ट परिस्थितींत कसा टाळतां येणें शक्य आहे त्याचें मार्गदर्शन कलकत्त्याच्या हायकोर्टाच्या एका ताज्या निर्णयावरून होण्यासारखें आहे. त्यासाठी प्रथम आपण त्या निर्णयामागील हकीगत पाहूं. प्रतिवादी श्री. गांगुली यांनीं वादी श्री. कमलपत सिंग यांचें घरांतील कांहीं भाग तात्पुरता वापरावयास घेतला होता. तत्संबंधींच्या अटी एका पत्रामध्यें नमूद करण्यांत आल्या होत्या. मुदत सुमारें सहा महिन्यांची ठरली होती. ती मुदत १४।७।४३ पासून ३१।१२।४३ पर्यंत होती. तबेला सोडून घराचा सर्व तळमजला भाड्यानें दिलेला होता. स्वयंपाकघर व जेवणघर यांचा ताबा मात्र सदर तारखेनंतर ८ दिवसांनीं मिळणार होता. भाडें सर्व करासुद्धां दरमहा ७० रुपये ठरलें होतें. तें दर महिन्याच्या ७ तारखेस वा त्या आधीं द्यावयाचें असून कराराचे पत्रामध्यें भाड्याचा उल्लेख जागेच्या वापराबद्दलची नुकसान भरपाई असा केलेला होता. तळ मजल्याचा निराळा मीटर लावलेला होता व त्यास अनुसरून विजेचा खर्च स्वतंत्रपणें द्यावयाचा होता.

घरामध्यें एक विजेचा पाण्याचा पंप बसविलेला होता. त्याच्या विजेच्या खर्चापैकीं ½ खर्चहि भाडेकऱ्यांनीं द्यावयाचा होता. जागेंत येण्याचे मुख्य फाटकासुद्धां जागेवरील सर्व हुकमत भाडेकऱ्याकडेच देण्यांत आलेली होती आणि ३१।१२।४३ चे आंत जागा खाली करून देण्याची कबुली घेण्यांत आलेली होती. सदरील करारपत्राच्या भाषेमध्यें भाडेपट्टा, भाडें वगैरे शब्द मुद्दाम टाळून सदरचा करार केलेला होता. जागा वापरण्याबद्दल तात्पुरती सवलत आणि भाड्याबद्दल नुकसानभरपाई असे शब्द प्रथमपासून वापरले होते. त्यावरून खालील कोर्टानें असा निर्णय दिला कीं सदरचा करार भाडेपट्टा नसून त्यास भाडें नियंत्रण कायदा अर्थातच लागू पडत नाहीं. या करारपत्रावरून घरमालकानें केवळ जागा वापरण्याची मुभा अथवा परवाना प्रतिवादीस दिलेला दिसतो, असें कोर्टाचें म्हणणें पडलें. भाडेंकरार व मुभा यांच्यामध्यें पुष्कळ वेळां फारच थोडा फरक आढळतो. करारपत्राचा उद्देश जर जागेचा संपूर्ण ताबा देण्याचा असेल व त्यांत इतरांना वगळून वापर करण्याचा हक्क जर मिळत असेल तर जरी कांहीं विशिष्ट शर्ती अथवा अटी घातलेल्या असल्या तरी सदर करारपत्राचा अर्थ भाडेपट्टा असाच होतो. परंतु जेव्हां करारपत्रावरून जागेचा वापर करण्याचा हक्क अथवा अधिकार कांहीं अटी घालून दिलेला असला तरी जागेचा ताबा मात्र संपूर्णपणें दिलेला नसला—मालकाचा कांहीं वापर तेथें होत असला—तर अशा करारपत्राचा अर्थ मुभा अथवा परवाना, असा होतो. इझमेन्ट्स् ॲक्टाच्या ५२ व्या कलमांत मुभा अथवा परवाना ( लायसेन्स ) ची व्याख्या दिली आहे. ती अशी:—जेव्हां एकादा मनुष्य दुसऱ्या एकाद्या मनुष्यास स्थावर मिळकतीवरील वापराचे बाबत कांहीं अधिकार देतो, तेव्हां तसे अधिकार दिले नसतांना सदरचा मनुष्य त्या स्थावर मिळकतीवर तशाच प्रकारचा वापर करूं लागला असतां तो अनधिकृत व बेकायदेशीर ठरेल असें त्या अधिकाराचें स्वरूप असेल तेव्हां, आणि सदरचा दिलेला अधिकार जेव्हां त्या स्थावर मिळकतीमध्यें कांहीं हितसंबंध उत्पन्न करूं शकत नसेल तेव्हां, ते दिलेले अधिकार म्हणजेच परवाना अथवा मुभा होय. ही व्याख्या या दाव्यांतील करारपत्रास लावावयाची झाल्यास दोन तीन मुद्यांचा विचार करणें भाग पडतें. या दाव्यांतील करारपत्रापोटीं प्रतिवादी वादीस कांहीं रक्कम दरमहा देत आहे, परंतु महिन्याला जागेच्या वापराबद्दल कांहीं रक्कम देणें एवढ्यावरूनच कांहीं कराराचा अर्थ भाडेपट्टा असा होणार नाहीं. परवाना किंवा मुभा घेण्याबद्दलहि दरमहा रक्कम द्यावयास कांहीं हरकत नाहीं. प्रतिवादींनीं ३१।१२।४३ रोजीं जागा खाली करून द्यावी असें करारांतील एक कलम आहे. परंतु या मुदतबंदीमुळें हा करार केवळ भाडेपट्टा होईल, परवाना असूं शकणार नाहीं, असें नाहीं. कारण परवानासुद्धां कांहीं ठराविक मुदतीचा असा देतां येईल. प्रतिवादींनीं जागेवरील कर वगैरे भरण्याची जबाबदारी घेतलेली आहे. त्यामुळें भाडेपट्ट्याचा संभव दिसतो; परंतु हा मुद्दा निर्णायक नाहीं. महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं प्रतिवादी हा वादीस तळमजल्यावरील कांहीं जागेचा वापर करण्याची सवलत देत आहे. त्यावरून मात्र असें स्पष्ट होतें कीं, प्रतिवादीकडे जागेचा संपूर्ण ताबा, आपल्याव्यतिरिक्त इतरांना वापर करण्यास प्रतिबंध करण्याच्या हक्कासुद्धां, दिलेला आहे. ही गोष्ट मात्र परवान्याच्या व्याख्येंत धरून नाहीं; भाडें कराराच्या स्वरूपास धरून आहे, असें अपिलांत कलकत्ता हायकोर्टाचें मत पडलें व त्यावरून प्रतिवादी भाडेकरी धरला जाऊन जागा खाली करून द्यावी लागली.

या निकालावरून भाडेकरी म्हणून नव्हे तर मुभादार म्हणून जागा वापरावयास कशी द्यावी व तद्वारां भाडें नियंत्रण कायद्याचीं बंधनें कशीं टाळावींत याचें दिग्दर्शन स्पष्ट रीतीनें झालेलें आहे. ( १ ) विशिष्ट रक्कम दरमहा जागेच्या वापरामुळें होणाऱ्या नुकसानीची भरपाई म्हणून ठरवून घेऊन ( २ ) कोणतीहि विशिष्ट मुदत ठरवून देऊन ती संपल्यानंतर जागेचा वापर करण्याचा थांबविण्याची अट घालून, मुभादारास जागा देतां येईल ( ३ ) फक्त वापरावयास दिलेली जागा मुभादाराच्या संपूर्णपणें ताब्यांत न देतां तिचा कांहीं स्वरूपांत वापर करारापुरता मालकानें स्वतःकडे ठेवला म्हणजे झालें! अशा प्रकारें मुभा देऊन जागेचा वापर करावयास सांगितलेल्या परवानेदारास भाडें नियंत्रण कायदा लागू नाहीं व म्हणून त्यास काढून टाकणें अथवा त्याचेकडून इष्ट तर जादा भाडें घेणें जागेच्या मालकास सर्वस्वी शक्य व कायदेशीर आहे. ( A. I. R. 1947 Calcutta 236 )

**हिंदुस्थानाला एकहि आगबोट मिळाली नाहीं**—जर्मनीच्या नाविक दलापैकीं ७,५०,००० टन वजनाच्या आगबोटी नुकसानभरपाईसाठीं राखून ठेवण्यांत आल्या होत्या. ह्या जहाजांची संख्या २६२ होती. पण त्यांपैकीं एकही हिंदुस्थानला देण्यांत आलेलें नाहीं.

**आसाम सरकारची मदतीची मागणी**—आसाम सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ४० कोटी रुपयांची मदत मागितली आहे. ह्या मदतीच्या अभावीं प्रांतांतील औद्योगिक पुनर्घटना अडून राहिली आहे असें आसाम सरकारचें म्हणणें आहे. ह्याशिवाय आसामधील पेट्रोल, चहा आणि ज्यूटवर सरकार जी जकात घेतें, त्यांतीलहि १० कोटी रुपयांची मागणी आसाम सरकारनें केली आहे.

**रशिया-हिंदुस्थान व्यापार**—हिंदुस्थान सरकारतर्फे व्यापारी वाटाघाटींसाठी श्री. नानावटी हे मॉस्कोला गेले होते. पुढील वर्षाच्या पहिल्या सहामाहींत हिंदुस्थान सरकारला रशियाकडून अन्नधान्यें आणि रासायनिक खतें मिळूं शकतील असें आश्वासन त्यांना मिळालें आहे. श्री. नानावटी पोलिश सरकारच्या आमंत्रणावरून वॉर्सालाही जाणार आहेत.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.